जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना वैद्यकिय सुविधा कुटुंब नियोजन -सवलती.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक डीईएन-२०९०/२६६४:प्र.क्र.३४०/९०/२०,
मंत्रालय मुंबई- ४०००३२ दि. ३/७/९१.

परिपत्रक.
=======

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा(वैद्यकिय देखभाल) नियम १९७१ लागु आहेत. महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील नियम १४ आणि नियम १५ अन्वये राज्य शासकिय कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या तरतूदी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. तो प्रस्ताव स्वीकारण्यात आला आहे.

२.८ महाराष्ट्र राज्यसेवा ( वैद्यकिय देखभाल ) नियम १९६१ मधील नियम १४ मध्ये अशी तरतूद आहे की, ज्या शासकिय कर्मचाऱ्यांना तीन पेक्षा कमी मुले असतील अशा कुटुंबानी तीन जिवंत मुलाइतके आपले कुटुंब मार्यादित ठेवले नसेल तर त्यांच्या कुटुंबांना मिळणाऱ्या विनामूल्य वैद्यकिय उपचारा संबंधीच्या सवलती मिळणार नाहीत.(हा नियम १५ ऑगष्ट १९६८ पासुन अंमलात आहे ) नियम १५ मधील तरतूदीनुसार दिनांक १५ आगष्ट १९६८ रोजी ज्या शासकिय कर्मचाऱ्यांची तीन पेक्षा अधिक मुले जिवंत आहेत. अशा आई-वडिलांना (स्त्री-पुरुष) त्या तारखे नंतर त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीचा संख्या आणखी वाढविली असली/नसली तरी सुद्धा जी १५ ऑगष्ट १९६८ पुर्वी जन्मलेली आहेत अशा मुलांना वैद्यकिय सोयी मिळण्याच्या हक्कास कोणतीही बाधा येता कामा नये. मात्र आई-वडिलांनी तसेच ठरवुन दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या जादा मुलांना विनामूल्य वैद्यकिय उपचारा संबंधीच्या सवलती मिळणार नाहीत. विना मूल्य वैद्यकिय उपचाराच्या सवलती मिळण्याचा ज्यांना हक्क होता अशा मुलांना अनुज्ञेय असलेल्या विनामुल्य वैद्यकिय उपचाराच्या सोयी मिळण्याचे चालुच राहील. परंतु जननक्षम गटात असतांना जर आईवडिलांना ( शासकिय कर्मचारी किंवा त्यांची पत्नी ) यांनी निर्जंतुकरण्याची शस्त्रक्रिया करुन घेतली असेल आणि अशी शस्त्रक्रिया जेथे करण्यात आली त्या रुग्णालयाच्या किंवा दवाखान्याच्या प्रभारी असलेल्या सक्षम वैद्यकिय प्राधिकारी यांच तशी अर्थाचे प्रमाण पत्र सादर केले असेल तर त्या आई- वडिलांच्या शस्त्रक्रिया केल्याच्या दिनांकापासुन वैद्यकिय सवलती मिळण्याचा त्यांना पुन्हा हक्क राहील. परंतु ठरवुन दिलेल्या मर्यादेहून अधिक असलेल्या मुलास/मुलांना अशा सवलती मिळणार नाहीत.

वरील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या तरतुदी महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल ) नियम १९६१ या शासकिय नियमावलीत समाविष्ट आहेत. त्याप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा( वैद्यकिय देखभाल )

//२//

॥२॥

नियम १९७१ मध्ये जिल्हा परिषद कर्मचा-यांच्याबाबतीत ही त्रुटी राहू नये म्हणुन जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या नियमातही सुधारणा करण्यात येत आहे. तो पर्यंत सदर १९६१ च्या नियमातील नियम १४ व १५ ची सर्व जिल्हा परिषदांनी अंमलबजावणी करण्यास शासन स्तरावर मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

आवक क्र. जिल्हा परिषद जळगाव
आवक क्र. १३९८८
दिनांक ९.१०.८९

सही/-xxx
( म. स. गद्रे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति-

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

जा.नं.सापवि-अस्था-८-आरआर-८७१-९१
जि.प.जळगाव दिनांक ५/१०/८९

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१) म. खाते प्रमुख(सर्व) जि.प.जळगाव.

२) म. उप मुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.) जि.प.जळगाव.

३) म. प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं. जळगाव.

४) म. कार्यक्रम अधिकारी अवर्षण प्रवण क्षेत्र जळगाव.

५) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो.(सर्व) जि.जळगाव.

६) प्रमुख कृषी अधिकारी प्रशिक्षण व भेट योजना जळगाव.

७) गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) जि.जळगाव.

८) उप अभियंता जि.प. बांधकाम सिंचन व पुनर्वसन उपविभाग(सर्व)जि.जळगाव.

९) वैद्यकिय अधिकारी प्राथ.आरोग्य केंद्र (सर्व) जि.जळगाव.

२/- अर्थ खात्याने बिलांची तपासणी केल्यानंतरच बिले देण्यात यावीत.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगाव करिता.

गालफाडे/